**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २२ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. **इराण-इस्रायल संघर्षात अमेरिकेची उडी; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इराणचे अध्यक्ष डॉ.मसूद पेजेशकियन यांच्याशी चर्चा.**
2. **त्रंबकेश्वर येथे कुंभमेळ्यासाठी नाशिककडे येणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरण आणि बळकटीकरणासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची तत्वतः मान्यता; मुख्यमंत्र्याची नागपूरात माहिती.**
3. **आषाढवारीसाठी संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर पालख्या पुण्याहून रवाना.**
4. **ऑपरेशन सिंधु मार्फत इराणमधून १ हजार ११७ भारतीयांना परत आणण्यात यश.**

**इराण-इस्रायल संघर्ष**

इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ला करुन अमेरिकेनं इराण-इस्रायल संघर्षात जाहीररीत्या उडी घेतली आहे. दहशतवादी कारवायांना रसद पुरवणाऱ्या देशाला लगाम घालण्यासाठी इतर कोणताही पर्याय शिल्लक राहिला नसल्यानं अमेरिकेनं नाईलाजास्तव ही कारवाई केल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे. इराणन आता शांतता प्रस्थापित करावी असं आवाहनही त्यांनी केलं आहे.......

***Fordeaux, Natanz and Esfahan for years as they built this horribly destructive enterprise. Our objective was the destruction of Iran's nuclear enrichment capacity. And I can report to the world that the strikes were a spectacular military success. Iran's key nuclear enrichment facilities have been completely and totally obliterated. Iran, the bully of the Middle East, must now make peace. If they do not, future attacks will be far greater.***

अमेरिकेच्या या कारवाईचं इस्राएलन स्वागत केलं आहे. त्यापाठोपाठ इस्रायलन पश्चिम इराणमधल्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत. अमेरिकेनं केलेला हल्ला आंतरराष्ट्रीय कायदा, संयुक्त राष्ट्रांची सनद आणि अण्वस्त्र प्रसार विरोधी कायद्याचं उल्लंघन करणारा असल्याचं सांगत इराणन तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या हल्ल्याचे दूरगामी परिणाम होतील, असा इशाराही इराणनं दिला आहे. हल्ला झालेल्या फोर्डो, नतांज आणि एस्फहान इथं निवासी भागात कुठलाही किरणोत्साराचा धोका सर्वेक्षणात आढळलेला नाही, तसंच आपला अणुकार्यक्रम जारी राहील, असं इराणच्या अणुऊर्जा संस्थेनं म्हटलं आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज इराणचे अध्यक्ष डॉ.मसूद पेजेशकियन यांच्याशी चर्चा केली आणि इराण आणि इस्रायलमधील सुरू असलेल्या संघर्षात अलिकडच्या काळात वाढलेल्या वाढत्या तणावाबद्दल तीव्र

चिंता व्यक्त केली. समाजमाध्यमावरील पोस्ट मध्ये त्यांनी सध्याच्या परिस्थितीबद्दल इराणच्या अध्यक्षासोबत सविस्तर चर्चा केली. पंतप्रधान मोदींनी तणाव कमी करण्यासाठी, संवाद आणि मुत्सदेगीरीच तसच प्रादेशिक शांतता, सुरक्षा आणि स्थिरता लवकरात लवकर पुनर्संचयित करण्याच आवाहन केल. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस यांनी अमेरिकेच्या इराणवरच्या हल्ल्यांमुळ पश्चिम आशियातला संघर्ष नियंत्रणाबाहेर जाऊ शकतो, असा इशारा दिला आहे. अमेरिकेचे हल्ले हा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेसाठी एक मोठा धोका असल्याचं गुटेरस यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. दरम्यान, अमेरिकेचे लष्करप्रमुख जनरल डॅन केऐन पेंटांगान येथे सध्या पत्रकार परिषदेत इराणवर काल रात्री केलेल्या "ऑपरेशन मिडनाईट हॅमर" याविषयी माहिती देत आहेत.

**बैठक**

2027 मध्ये नाशिक आणि त्रंबकेश्वर इथं कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी राष्ट्रीय महामार्गाच्या नेटवर्क वाढवण्याच्या दृष्टीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र दिल होते. त्यानुसार केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरच्या हैदराबाद हाऊस इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत आढावा बैठक घेतली. यावेळी नाशिक येथील कुंभमेळ्यासाठी छत्रपती संभाजीनगर, नागपूर, खान्देश तसच राज्याच्या आठ दिशातून नाशिककडे येणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण बळकटीकरण तसच येथील सुविधांच्या बाबतीत गडकरी यांनी तत्वतः मान्यता दिली आहे. अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना दिली ..........

***जवळपास आठ प्रमुख रस्ते जे म्हणजे संभाजीनगर कडनं नाशिक ला येणारे रस्ते असतील, नागपूरकडनं येणारे रस्ते असतील, धुळ्याकडनं येणारे रस्ते असतील, इकडे गुजरात कडनं येणारे रस्ते असतील, मुंबईकडनं येणारे रस्ते असतील, पालघरकडनं येणारे रस्ते असतील, अशे सगळे जे रस्ते आहेत कि ज्याचा जास्तीत जास्त उपयोग हा कुंभच्या काळामध्ये होणार आहे. आणि प्लस काही अंतर्गत रस्ते देखील राष्ट्रीय महामार्गाकडे आहेत. अशा सगळ्या रस्त्यांच्या विकासाच्या संदर्भात आज ही बैठक झालेली आहे आणि माननीय गडकरी साहेबांनी जवळपास या सगळ्या रस्त्यांना तत्वतः मान्यता दिलेली आहे.***

यासोबतच नागपुरातील नाग नदी पुनर्जीवन प्रकल्प अंतर्गत जपान मधील जायका पुरस्कृत कंपनीद्वारे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प भूमिगत विजवाहीनी तसच खाजगी बसेसच्या शहराबाहेरच्या वाहनतळाबद्दल देखील या बैठकीत चर्चा करण्यात आली. अस फडणवीस यांनी सांगितल.

**११ वर्ष सुशासन**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं, भारतानं गेल्या दशकात, उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी आपल्या श्रोत्यांसाठी, गेल्या अकरा वर्षात, प्रमुख क्षेत्रांमधील सरकारच्या प्रयत्नांवर एक विशेष लेख-मालिका सादर करत आहे. त्यात आज, भारताच्या उर्जाक्षेत्रामध्ये केलेल्या कामगिरीचा आढावा ऐकुया....

***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या११ वर्षातभारतानं सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणया तत्त्वांवर आधारित उपक्रमांमधून लक्षणीय बदल घडवला आहे. गेल्या दशकभरात भारतातल्या उर्जा क्षेत्रात मागणी आणि पुरवठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. त्यात नवीकरणीय आणि अपारंपरिक उर्जास्रोतांचा मोठा वाटा आहे. जून२०२५ पर्यंत देशाची एकूण उर्जा उत्पादन क्षमता ४७६ गिगावट्स पर्यंत पोहोचली आहे. सौरउर्जेच्या बाबतीत भारताचा आता जगात तिसरा क्रमांक लागतो तर पवन उर्जेच्या बाबतीत भारत जगात चौथ्या क्रमांकावर आहे. एप्रिल २०१८ पर्यंत देशातल्या १००टक्के खेड्यांपर्यंत वीज पोहोचली. त्यात २ कोटी ८०लाख घरांचा समावेश आहे. वीज टंचाईदूर झाली, विजेचा दरडोई वापर ४५ टक्क्यांनी वाढला आहे. प्रधानमंत्री सूर्य घर योजनेमुळे शेतकऱ्यांना उर्जा निर्मितीला प्रोत्साहन मिळत आहे. दरम्यान, कोळसा उत्पादन क्षेत्राचंही आधुनिकीकरण झालं असून त्यावरचं अवलंबित्व आणि ताण कमी झाला आहे. एकूणच स्वच्छ आणि हरितउर्जा उत्पादनाच्या दिशेने भारताची दमदार वाटचाल सुरु आहे.***

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

कारगील विजय दिवसानिमित्त लडाखमध्ये आयोजित सरहद शौर्यथॉनला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज हिरवा झेंडा दाखवला. या मॅरेथॉनमध्ये देशभरातून अडीच हजारांहून अधिक धावपटू सहभागी झाले असून यातून देशाचा आपल्या लष्करावरचा दृढ विश्वास दिसून येत असल्याचं शिंदे यांनी यावेळी सांगितलं. भारतीय लष्कर आणि सरहद संस्थेनं आयोजित केलेला हा उपक्रम जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये शांतता, देशभक्ती आणि पर्यटन या दृष्टीनं महत्त्वपूर्ण आहे, असं ते म्हणाले. कारगिल युद्ध स्मारकासाठी महाराष्ट्र सरकारतर्फे तीन कोटी रुपयांचा धनादेश त्यांनी यावेळी लष्कराकडे सुपूर्द केला.

**दिंडी**

आषाढ वारीसाठी संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांच्या पालख्या आज पुण्यातून हडपसर मार्गे पंढरपूरसाठी मार्गस्थ झाल्या. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आज सकाळी सहा वाजता निघाली असून ती आज दिवेघाट मार्गे सासवडला जाणार आहे. तर,संत तुकाराम महाराजांची पालखी आज सकाळी साधारण सात वाजता मार्गस्थ झाली. या पालखीचा मुक्काम आज लोणी काळभोर इथं असेल. पुण्यात काल

दोन्ही पालख्यांच्या दर्शनासाठी काही किलोमीटर पर्यंतच्या रांगा लागल्या होत्या. दोन्ही मंदिरांच्या बाहेर भव्य मंडप उभारण्यात आला होता. वारीचं औचित्य साधून केंद्र सरकारच्या योजनांविषयी जनजागृती करणारे कार्यक्रम कसबा आणि भवानी पेठ परिसरात केंद्रीय संचार ब्यूरोतर्फे सादर करण्यात आले. राज्यभरातून आषाढीसाठी अनेक दिंड्या पंढरपूरकडे येत आहेत. राज्यातल्या ८० शहरांतून चार हजार सायकलची दिंडी पंढरपुरात येऊन पोहोचली आहे.

**ऑपरेशन सिंधू**

ऑपरेशन सिंधू अंतर्गत इराणमधे अडकलेल्या अकराशे सतरा भारतीय नागरिकांना आतापर्यंत मायदेशी परत आणल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली. ऑपरेशन सिंधू अंतर्गत इराणमधून पहिल्या टप्प्यात ११० नागरिकांना मायदेशी आणलं होतं. दुसऱ्या टप्प्यात २९०, तिसऱ्या टप्प्यात ११७, चौथ्या टप्प्यात ३१० नागरिकांना मायदेशी आणलं गेलं. तर पाचव्या टप्प्यात २९० नागरिक भारतात परतले. उरलेल्या नागरिकांनाही लवकरच मायदेशी परत आणलं जाईल, असं जयस्वाल यांनी सांगितलं.

**हवामान**

नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्यान पुढील एका तासात नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर आणि गोंदिया जिल्हयाच्या तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह तसच सोसाट्याच्या वाऱ्यासह  हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवली आहे. उद्या देखील असेच वातावरण नागपूर अमरावती अकोला बुलढाणा इथं राहणार असल्याच हवामान खात्यातर्फे सांगण्यात आल आहे.

******